# जिल्हा परिषद, सोलापूर

## सामान्य प्रशासन विभाग-२ (ग्रामपंचायत)

## ग्रामपंचायत विभागाकडील विविध योजनेबाबतची माहिती.

## जिल्हा परिषद,सोलापूर

## सामान्य प्रशासन विभाग -२(ग्रामपंचायत)

## १३ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर

**१३ वा वित्तआयोग :-** महाराष्ट्र शासन निर्णय क्रं तेराविआ२०१०/प्र.क्र२२./ वित्त-४ /ग्राम/विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ३०.८.२०१० अन्वये केंद्र शासनसच्या १२ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थाचे बळकटीकरणासाठी सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीसाठी निधी दिला जाणार आहे

**योजनेचे स्वरुप:-** वरील शासन निर्णयानुसार निधी ग्रामपंचायतीच्या लोकसंखेच्या प्रमाणात ग्रामपंचायतीनां वितरीत करावयाचा आहे ग्रामपंचायत स्तरावरील निधी ग्रामपंचातीनी १३ व्या वित्त आयोगाच्या नावाने राष्ट्रीय कृत बँकेत सरपंच व ग्रामसेवक यांचे संयुक्त सहीचे स्वतंत्र खाते उघडुन खातेवर वर्ग करावयाचे आहे. ग्रामपंचायतीने प्राप्त निधीचा विनियोग प्रामुख्याने १. ग्रामपंचायतींना त्यांच्या स्तरावर करण्यात येणाऱ्या कामाच्या तांत्रिक देखरेखीसाठी कंत्राटी पध्दतीने तंत्रज्ञ (कनिष्ठ अभियंता /तंत्रज्ञ) नेमणे.२. ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे ठेवण्यासाठी कंत्राटी पध्दतीने लेखापाल (Accountant) नेमणे. ३. ग्रामपंचायतींनी संगणकीय कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने संगणक तंत्रज्ञाची/तज्ञांची (computer Experts) नेमणूक करणे.४. ग्रामपंचायत स्तरावर गावाचा नियोजन आराखडा (Village Plan) व पर्यावरण विकास आराखडा (Environment Plan) तयार करण्यासाठी टाऊन तंज्ञांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे. अनुक्रमांक १,२,३, व ४ साठी कनिष्ठ अभियंता / तंत्रज्ञ लेखापाल , संगणक तज्ञ व टाऊन प्लॅनिंग तज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्या संदर्भात आवश्यक अटी व शर्ती , त्यांच्या नेमणुकी बाबतची कार्यपध्दती व त्या संदर्भातील सविस्तर सूचनांबाबतचे शासन परिपत्रक यथावकाश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे. शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन परिपत्रकामध्ये नमूद बाबींच्या अधिन राहूनच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील अनुक्रमांक १ ते ४ बाबत आवश्यकती कार्यवाही करावी. ५. ग्रामपंचायतींच्या क्षेत्रांतर्गत निर्माण झालेल्या विविध सत्तांची (Assets) देखभाल व दुरुस्ती करणे. ६. गावांतर्गत गटारे व गावांतर्गत रस्ते बांधकाम (मुरुमीकरण, खडीकरण, डांबरीकरण व सिमेंट कॉक्रीटीकरण) तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे, सदर कामे करताना शासनासे विहीत केलेल्या मानकांचे तंतोतंत पालन करावे. एकच काम वेगवेगळया योजनांच्या निधीतून एकाच वेळी हाती घेण्यात येणार नाही व निधींचा अपव्यय / दुरुपयोग होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी. ७.ग्रामपंचायत कार्यालय / ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती (हे बांधकाम बी.आर.जी.एफ चा निधी व एम. आर. इ. जी.एस. अंतर्गत राजीव गांधी भवनासमोर एकत्रितपणे विहीत प्राधिकाऱ्याची मंजूरी घेऊन करता येईल.) ८ .दहनभूमी / दफनभूमीची देखभाल व दुरुस्ती. ९. आरोग्य , ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनातील निगडीत कामे. (उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फ्लॅगिंग मशीन, घंटागाडी, ट्रॅक्टर, ट्रॉली ) १०.घनकचरा प्रक्रीयेसाठी (Solid Waste Manegement) पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कामे खर्चाचे प्रकल्प हाती घेणे. ११. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसंबंधी ग्रामविकास विभागांचे निर्गमित केलेल्या दिनांक १८ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या विविध बाबींसाठी

पूरकनिधी म्हणून या निधीचा वापर करणे. १२.ग्रामसभा / ग्रामपंचायत सभा यांच्या दृकश्राव्य चित्रीकरणाची (Video / Audoi recording) व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपकरणे / साधने घेणे व त्यांसाठी आवश्यक तंत्रबळ उपलब्ध करुन घेणे.

**योजनेचे उदिदष्ट** :- निधी शासनाकडुन जिल्हा परिषदांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बीडीएस वर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदांनी तो निधी तात्काळ कोषागारातून काढून वित्त आयोगासाठी स्वतंत्रपणे उघडण्यात आलेल्या बॅक खात्यात जमा करुन घ्यावा. ग्रा.पं. स्तरासाठीचा निधी विहीत केलेल्या निकषांच्या आधारे ५ ते १० दिवसात ग्रामपंचातींच्या खात्यावर इ.सी.एस. /एन.इ.एफ.टी. , आय. एफ.एस.सी. या बॅंकींग सिस्टीमद्वारे वर्ग करण्यात यावा.

**योजनेचे फायदे** :- १३ वा वित्त आयोगाच्या निधीमुळे ग्रामपंचायतीची आर्थिक परिस्थिती सुधारुन जनतेला सोयी- सुविधा पुरविणे सोईचे झालेले आहे.

**निधी वितरण** :- सदर योजनेचे निधी शासन स्तरावरुन प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायतीना ५ ते १० दिवसांत वितरित करावयाचा आहे.ग्रामपंचायतीनी सदर निधी १३ वा वित्त आयोगाच्या नावांने स्वतंत्र राष्ट्रीयकृत बॅकेत जमा करुन वरील शासन निर्णयानुसार अंमल बजावणी करावयाची आहे.

**निधी व्यवस्थापन** :- सदर योजनेतुन निधी प्राप्त झाल्यापासुन सहा महिन्यांच्या आत खर्च करावयाचा आहे . सदर निधीमधुन काम निवडताना ग्रामपंचायतीची सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे जरुरीचे आहे. निधी वेळेत खर्च करण्याची जबाबदारी संबधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांची आहे.सदर निधी खर्चाचे आढावा दर पंधरा दिवसांनी गटविकास अधिकारी यांनी घ्यावयाचा असुन आर्थिक व भौतिक अहवाल दर माहे २ तारखेपर्यंत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे सादर करावयाचा आहे.

| अ.क्र | दिनांक | प्राप्त अनुदान | प्रस्तावित कामे | पुर्ण कामे | खर्च अनुदान | शिल्लक र.रु लाखात | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६.१२.२०१० | ७३७६५९९२ | १२४६ | ११९० | ७०४८८३०८ | ३२७७७८४ | ९५.५५ | ग्रापं स्तर वाटप |
| २ | १३.६.२०११ | २६६५४७९१ | | | | | | ग्रापं स्तर वाटप |
| ३ | २४.१०.२०११ | ९३११४००० | | | | | | ग्रापं स्तर वाटप |
| एकुण | | १९३५३४७८३ | | | | | | |

# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर

## संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान

सदरची योजना सन २०००-०१ पासून सुरु झाली. ग्रामीए स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचाविण्याचा आहे. ग्रामीण भागात अशुध्द पाण्यामुळे, अस्वच्छ परिसरमुळे व वैयक्तिक स्वच्छतेअभावी पिडीत लोकांची संख्या वाढत असल्यामुळे सदरची योजना सुरु करण्यात आली. या योजनेंचे **स्वच्छतेतून समृध्दीकडे** हे ब्रिद वाक्य आहे.

महाराष्ट्र शासनाचे संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविणे बाबत खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चीत करुन दिलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत या कार्यालयाकडील पत्र जाक्र.जिपसो/साप्रवि-२/मुलकी-३/ ५१२/ दिनांक २५/९/२००९ ने गट विकास अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत.

१. दिनांक २६/९/२००९ ते २९/९/२००९ दरम्यान तालुकास्तरीय सभेचे आयोजन करणे.
२. दिनांक ३०/९/२००९ रोजी ग्रामपंचायतीची सभा आयोजित करणे.
३. दिनांक १/१०/२००९ रोजी महिलाग्राम सभा आयोजित करणे.
४. दिनांक २/१०/२००९ रोजी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान बाबत ग्रामसभा आयोजित करणे.
५. दिनांक ३/१०/२००९ ते ३१/१०/२००९ पर्यंत संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविणेत आलेले आहे.
६. दिनांक :- १७/१८ नोव्हेंबर रोजी अतरावती विभागीय समितीची पाहणी पूर्ण.
७. दिनांक :- २४.११.२००९ रोजी विभाग स्तरावरील ग्रामपंचायतींची निवड जाहीर झाली आहे.

सदर योजनेंतर्गत **पंचायत समितीस्तरावरील ग्रामपंचायतींना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

प्रथम क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. २५,०००/-
व्दितीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. १५,०००/-
तृतीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. १०,०००/-

सदर योजनेंतर्गत **पंचायत समितीस्तरावरील शाळा व अंगणवाडयांना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

एका शाळेस बक्षिस अनुदान रक्कम रु. १०,०००/-
एका अंगणवाडीस बक्षिस अनुदान रक्कम रु. ५,०००/-

सदर योजनेंतर्गत **जिल्हास्तरावरील ग्रामपंचायतींना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

प्रथम क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. ५,००,०००/-
व्दितीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. ३,००,०००/-
तृतीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. २,००,०००/-

सदर योजनेंतर्गत **जिल्हास्तरावरील शाळा व अंगणवाडयांना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.
एका शाळेस बक्षिस अनुदान रक्कम रु. ५०,०००/-
एका अंगणवाडीस बक्षिस अनुदान रक्कम रु. २५,०००/-

सदर योजनेंतर्गत **विभागस्तरावरील ग्रामपंचायतींना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

प्रथम क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. १०,००,०००/-
व्दितीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. ८,००,०००/-
तृतीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. ६,००,०००/-

सदर योजनेंतर्गत **विभागस्तरावरील शाळा व अंगणवाडयांना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

एका शाळेस बक्षिस अनुदान रक्कम रु. १,००,०००/-
एका अंगणवाडीस बक्षिस अनुदान रक्कम रु. ५०,०००/-

सदर योजनेंतर्गत **राज्यस्तरावरील ग्रामपंचायतींना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

प्रथम क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. २५,००,०००/-
व्दितीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. २०,००,०००/-
तृतीय क्रमांकाचे बक्षिस अनुदान रक्कम रु. १५,००,०००/-

सदर योजनेंतर्गत **राज्यस्तरावरील शाळा व अंगणवाडयांना देण्यात येणारे बक्षिस अनुदान बक्षिसाच्या रक्कमा** खालील प्रमाणे आहेत.

एका शाळेस बक्षिस अनुदान रक्कम रु. ३,००,०००/-
एका अंगणवाडीस बक्षिस अनुदान रक्कम रु. १,००,०००/-

**(२)**

**सदर योजनेतून लोक सहभागातून (श्रमदानातून)खालील कामे केली जातात.**

१. ग्राम सफाई करणे,
२. शोष खड्डयाची स्वच्छता/बांधकंम करणे,
३. शाळा व सार्वजनिक इमारती घर व परिसर स्वच्छता करणे,
४. स्वच्दता विषयक ज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके करणे.
५. रस्ते दुरुस्ती व साफसफाई करणे,
६. जनावरे स्वच्छ करणे,
७. वृक्षसंवर्धन, परसबागा लावणे,
८. गावात स्लोगन स्पर्धा, निबंध स्पर्धा,
९. व्यसनमुक्ती मोहिम,
१०. सुदृढ बालक स्पर्धा, माता बाल संगोपन, रोगनिदानव साथ प्रतिबंध.
११. गटारे सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहिम राबविणे.

# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर

## यशवंत ग्राम समृध्दी योजना माहिती

योजनेचे स्वरुपः- सदरची योजना सन २००२-०३ पासून सुरु झाली आहे. सदर योजनेंतर्गत सर्वसाधारण लोकवस्ती साठी १५% व दलित वस्तीसाठी १०% लोकवर्गणी भरुन एका आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. १०.०० लाख एवढ्याच रक्कमेचे काम घेता येते. लोकवर्गणी कगळता उर्वरीत रक्कम राज्य शासनामार्फत अनुदान स्वरुपात दिली जाते. सदर योजनेमधून पुढील प्रकारची कामे घेता येतात. १) पंचायत राज संस्थांच्या शाळांसाठी शाळा इमारती, क्रिडांगणे, आवाराच्या भिंती. २) अंगणवाडी इमारती.
३) ग्रामपंचायत कार्यालये (सर्व शासकीय कर्मचा-यांच्या कार्यालयासहीत).
४) गावांतर्गत रस्ते व गटारे.
५) दहन व दफन भूमी. ६) बस थांबा शेड.
७) गाव व वाड्यावस्त्यावरील विद्युतीकरणाची कामे.
८) वाचनालय/ग्रंथालय, व्यायामशाळा.
९) होड्या व वाहतुक माध्यमे खरेदी.

१०) पाळणा घरे व डे केअर सेंटर्स.
११) दुरस्ती व देखभाल जुन्या इमारतींची दुरुस्ती व देखभाल
१२) अन्य कोणतीही कामे:- शासन निर्णयातील परि. ६ मध्ये नमूद केलेली कामे वगळून ग्राम सभेने मंजुरी दिलेले अन्य कोणतेही काम.

योजनेचे उद्दिष्ट :- गाव पातळीवर ख-या अर्थाने गावामध्ये लोकांच्या सहभागातून ग्राम समृध्दी करावी असे सदर योजनेचे उद्दिष्ट आहे.

**सदरची योजना ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. विसआ-२००६/प्र.क्र.१३८१/पंरा-६ दि. ३.११.२००६ नूसार १ एप्रिल २००६ पासून पुढील आदेश होईपर्यंत ग्रामपंचायतींकडून नोकवर्गणी भरुन घेऊ नये असे आदेश आहेत.**

# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर
## ग्रामीण तिथक्षेत्र विकास योजना

**१) ग्रामीण भागातील मंदीराचा विकास करणेसाठी ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना सन-२००० पासुन शासनामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील मंदीराचे विकास करणेसाठी** क **वर्ग तिर्थक्षेत्र मंजुरीचे प्रस्ताव शासन निर्णय दिनांक १९९७ च्या सुचनाप्रमाणे तालुक्याचे पंचायत समितीकडुन प्राप्त होतात.सदरचे प्रस्ताव प्रमाणे** क **वर्ग मंजुरी देणेचे अधिकार जिल्हा नियोजन समितीस असल्याने जिल्हा नियोजन अधिकारी यांचे कडे पाठविण्यात येतात जिल्हा नियोजन समिती कडे** क **वर्ग तिर्थक्षेत्र म्हणुन मान्यता दिल्या नंतर जिल्हा स्तरीय तरतुदी मधुन मा.आमदार यांच्या शिफारशी नुसार सुचविलेल्या तिर्थक्षेत्राचे कामानां मा.पालक मंत्री यांची मान्याता घेवुन निधी मंजुरी करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत केली जाते तसेच राज्य स्तरीय तरतुदी मधुन निधी मिळण्याबाबत तालुक्याचे मा.आमदार,सभापती यांनी व मा.पालकमंत्री अथवा राज्यमंत्री यानीं सुचीत केलेल्या कामांना निधी मिळणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो व त्या प्रमाणे शासना कडुन मंजुरी प्राप्त होते जिल्हास्तरावरुन व राज्यस्तावरुन निधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामे कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग - १ व २ जि.प.सोलापुर व कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग अकलुज यांच्या मार्फत पूर्ण केली जातात.**

### सदर बाबतचे प्रस्ताव मंजूरीसाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता असते.

१ **तिर्थक्षेत्रास १.०० लाखापेक्षा जास्त भाविकानी भेट देणे आवश्यक.**
२ **जागेचा उतारा.**
३ **ग्रामसभेचा ठराव.**
४ **ग्रामपंचायतीचे देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र.**
५ **अंदाजपत्रक.**
६ **जागा ट्रस्टची असल्यास १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर जागा ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस दानपत्र.**
७ **स्थळदर्शक नकाशा.**
८ **कामे इतर कोणत्याही योजनेतून प्रस्तावित नसल्याचे उप अभियंता/ग.वि.अ. यांचे प्रमाणपत्र.**

# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर
## योजनेचे नाव : जिल्हा ग्राम विकास निधी

ग्रामपंचायतीकडून त्यांच्या उत्पन्नांच्या ठराविक रक्कम अंशदान म्हणून एकत्रित करून जिल्हा परिषदेकडे जमा केले जाते. त्या निधीस जिल्हा ग्राम विकास निधी असे म्हणतात.

सदरची योजना सन १९६४-६५ पासून चालू असून महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. व्हिपीएम/२६०५/प्र.क्र. ४०५०/पं.रा.-४ दिनांक २६/४/२००५ मंत्रालय मुंबई अन्वये २००५-०६ पासुन ग्रामपंचायतीच्या उत्पन्नच्या ०.२५% इतकी रक्कम अंशदान म्हणून जिल्हा परिषदेकडे जमा केली जाते.

जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या वतीने ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत या निधीचे हिशोब ठेवले जातात.

सदरचा निधी ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढीच्या कामासाठी आवश्यक असेल अशा बाबीसाठी ग्रामपंचायतींनी मागणी केल्यास स्थायी समितीच्या सम्मतीने द.सा.द.शे. ५% व्याज दराने कर्ज दिले जाते.

विभागीय आयुक्तांच्या परवानगीने स्थायी समितीकडे निधीचे कामकाज पाहणेसाठी नेमलेला सेवक वर्ग त्यांचे वेतन व त्याअनुंशंगाने लेखनसामुग्री, छपाई सामुग्री, मुद्रांक, पोस्टेज इ. बाबीसाठी सदर नीधीतुन खर्च करता येतो.

ग्रामपंचायतीकडून अंशदान म्हणून घेतलेल्या रकमेवर द.सा.द.शे. २.५% दराने ग्रामपंचायतींना व्याज दिले जाते. सोलापूर जिल्हा परिषदेने २००४-०५ अखेरचे व्याज दिलेले आहे.

**ग्रामपंचायतींना स्थायी समितीच्या परवानगीने कर्ज देण्याची पध्दत.**

१. कर्ज मागणीचा अर्ज.
२. कर्ज मागणीचे कारण.
३. आवश्यक कर्जाची रक्कम, अंदाजे किती खर्च येईल याचे विवरण पत्रक सक्षम प्राधीका-याकडून घेतले जाईल व एकूण अंदापत्रकीय खर्चाच्या ७५% कर्ज मंजुर केले जाते.
४. ग्रामपंचायतीने कर्जाच्या साहाय्याने केले जाणा-या कामाची व्यवस्था पाहण्यासाठी सदर खर्चाचे व्यवस्थापन २५% रकमेतून करावयाचे आहे.
५. ज्या मुदतीत कर्ज फेड करणार आहे त्या हप्त्यांची संख्या व मुदत नमुद केली पाहिजे.
६. ग्रामपंचायतीने मागील ३ वर्षाची आर्थिक स्थिती दर्शविणारे विवरणपत्रक सादर केले पाहिजे.
७. ज्या उत्पन्नातून कर्जाच्या वार्षिक हप्त्याची फेड करणार आहे तसेच त्यातून ज्यादा रक्कम उरणारी असेल तर त्याचे विवरणपत्रक द्यावे.
८. ग्रामपंचायतीच्या एकूण सभासदापैकी २/३ सभासदांनी कर्ज मागणी अर्जास पाठिंबा दिल्याचा ग्रामपंचायत ठरावाची प्रत अर्जासोबत आवश्यक आहे.
९. वरिल सर्व बाबींचा परीपूर्ण प्रस्ताव गट विकास अधिकारी यांच्या शिफारशीने येईल.

**स्थायी समितीकडून खालिल बाबींचा विचार करून कर्ज मंजुर केले जाते.**

१. अर्जाची व सोबतच्या सर्व कागदपत्रांची तपसाणी काळजीपूर्वक केली जाईल.
२. कर्ज ज्या कारणासाठी मागीतले असेल त्या कारणाची आवश्यकता पाहीली जाईल.
३. ग्रामपंचायतीची सद्याची आर्थिक स्थिती व कर्ज फेडण्याची ग्रामपंचायती क्षमता याची खात्री केली जाईल.
४. एकूण अंदाजे खर्चाच्या रकमेच्या ७५% कर्ज मंजुर केले जाते.
५. स्थायी समिती र.रु. ३०,०००/- पर्यंतचे कर्ज मंजुर केले जाते. व त्यापूढील कर्जास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असते.

**कर्ज परतफेडीची मुदत**

१. जिल्हा ग्राम विकास निधीतून घेतलेले कर्ज समान १० वार्षिक हप्त्यात परतफेड करावे लागेल.
   त्यावर द.सा.द.शे. ५% व्याजदर असेल तसेच थकलेल्या हप्त्यावर व व्याजावर २% दंडव्याज आकारला जातो.
२. स्थायी समितीस योग्य कारण वाटल्यास परतफेडीची मुदत १५ वर्षापर्यंत वाढविता येईल. तसेच स्थायी समितीस योग्य कारण वाटल्यास एखाद्या वर्षाचा हप्ता तहकूब करता येईल. परंतू तहकुबीमुळे परतफेडीची मुदत १० वर्षे किंवा १५ वर्षे पेक्षा जास्त होणार नाही याCreated on १२/१२/०८ ११:४४ AMची काळजी घेतली जाईल.
३. ग्रामपंचातीची सरपंच/ग्रामसेवक उप सरपंच व दोन सदस्य यांनी कर्ज फेडीबाबत योग्य त्या नमुन्यात संमतीपत्र व हमीपत्र मुद्रांकावर लेखी स्वरूपात दिले पाहीजे.
४. कर्जाची परतफेड होयीपर्यंत दरवर्षी अंदाजपत्रकात कर्जाची हप्त्याची व व्याजाची तरतुद केली पाहीजे.
   सदर निधीचा हिशोब नमुन्यातील अ ते क्यू या रजिष्ट्रर मध्ये ठेवला जातो व जिल्हा स्थानिक निधी लेख्याच्या मुख्य लेखा परिक्षकाकडून दरवर्षि सदर निधीच्या हिशोबाची तपासणी करण्यात येते.

# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर

## विषय :- ग्रामपंचायतीच्या सरपंचाना मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंचाना मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता देण्यासंर्दभात शासन निर्णय क्र.व्हीपीएम २६९९/प्रक्र२०६(२) दिनांक २१जानेवारी २००० अन्वये निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न लक्षात घेवुन सरपंचाना २००, ३०० व ४०० रूपये इतके मानधन दरमहा ग्रामपंचायतीकडुन देण्यात येत होते व ग्रामपंचायत सदस्यांना प्रती बैठक प्रतीमहा रू१०./- इतका बैठक भत्ता सन २००० पासुन देण्यात येत होते.

ग्रामपंचातीच्या सरपंचाच्या मानधनाच्या व सदस्यांच्या बैठक भत्याच्या दरात वाढ करण्याची घोषणा मा. मंत्री (वित्त) यांनी दिनांक ४ जून ,२००९ रोजी अर्थसंकल्प सादर करताना विधानसभेत केलेल्या भाषणात केली.

**शासन निर्णयः-**

ग्रामपंचायतीच्या सरपंचाना दरमहा मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता देण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**१ )सरपंचाना मानधनः-**

अ) दिनांक १ जुले २००९ पासून ग्रामपंचायतीची लोकसंख्यानिहाय वर्गवारी विचारात घेउन सरपंचाना ग्रामनिधीतून खालीलप्रमाणे दरमहा मानधन देय राहील

| ग्रामपंचायतीची लोकसंख्यानिहाय वर्गवारी | मानधनाची दरमहा रक्कम (रू) |
|---|---|
| (अ) ० ते २००० पर्यत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | ४००/- |
| (ब) २००१ ते ८००० पर्यत लोकसंख्येच्या ग्राग्मपंचायती | ६००/- |
| (क) ८००१ पेक्षा जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | ८००/- |

ब) सरपंच मानधन देण्याकरिता ग्रामपंचायतीला येणा-या खर्चापैकी ७५ टक्के खर्चाच्या प्रतीपूर्ती करीता शसन ग्रामपंचायतीला अनुदान देईल.

**२ ) ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता :-**

अ) दिनांक १ जुलै २००९ पासून प्रत्येक ग्रामपंचायत सदस्यांना दरमहा रू २५/- एवढा बैठक भत्ता ग्रामपंचायत अदा करील. एका महिन्यात एका बैठकीपेक्षा जास्त बैठका झाल्यातरी शासनाकडुन बैठकभत्यासाठी ग्रामपंचायतीला अनुदान दरमहा रू २५/- प्रमाणे मिळेल .थोडक्यात एका ग्रामपंचायत सदस्यास बैठकींना उपस्थित राहील्याबदल दरमहा जास्ती जास्त रू २५/- एवढा बैठक भत्ता ग्रामपंचातीकडुन अनुज्ञेय राहील .

ब) ग्रामपंचायत सदसयांना बैठक भत्ता देण्याकरीता ग्रामपंचायतीला येणा-या खर्चाच्या प्रतीपूर्तीकरीता शासन १०० टक्के अनुदान देईल.

**३ ) शासन निर्णय दिनांक १ जुलै ,२००९ पासून लागु करण्यात येत आहे.**

**४) सदर शासन निर्णय वित्त विभगाच्या संमतीने त्यांच्या अनौपचारीक संर्दभ क्र१४७/०९/व्यय-१५,दि २४.६.२००९ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे**